Vol II Issue VI Dec 2012

Impact Factor : 0.1870

ISSN No :2231-5063

# Monthly Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Golden Research Thoughts
Volume 2, Issue. 6, Dec. 2012
ISSN:-2231-5063

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# आदिवासी विकासात ऐच्छिक संस्थेची भुमिका

दासरवाड राजकुमार पंढरी

सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड

**सारांश**

भारतीय समाजाचे मुख्य वैशिष्टय म्हणजे ग्रामीण समाज आणि नागरी (शहरी) समाज आहे. या दोन समाजापेक्षा वेगळा राहणारा समाज म्हणजे आदिवासी समाज आहे. 2001 च्या जनगणनेनुसार आदिवासी समाजाची लोकसंख्या पाहिली तर 9 कोटी च्या वर आहे. आदिवासी समाज हा शासनाच्या सर्व योजने पासून वंचित राहिलेला आहे. त्यामुळे या आदिवासी समाजातील घटकांची सामाजिक, आर्थिक, राजकिय, शैक्षणिक, अरोग्य स्थिती चांगली नाही. त्यामुळे या घटकांच्या समस्या वाढतच गेल्याचे चित्र आपणास पाहायला मिळत आहे. त्यामध्ये साक्षरता, कुपोशन, रोजगार, कुष्ठरोग, विविध आजार, शोषणे, पिळवणूक, अंधश्रध्दा, धर्मभोळेपना, आधूनिकतेचा अभाव इत्यादी. आदिवासी समाजाची अशा प्रकारची स्थिती सुधारण्यासाठी मानवतावादी दृष्टीकोनातून ख्रिश्चन धर्माचे प्रसार करणारे ख्रिश्चन मशीनऱ्या इत्यादींनी प्रयत्न केले. पुढे असेच अनेक स्वंयसेवी संस्था आदिवासी लोकांचा सर्वांगिन विकास साध्य करण्यासाठी अनेक सामाजिक कार्यकर्ते समोर येवून विकास कार्य केलेले आहेत.तर भारत सरकारने स्वातंत्र्यत्तोर काळात केंद्रिय पातळीवर स्वातंत्र्य आदिवासी मंत्रालयाची स्थापना करुन पंचवार्शिक योजनेच्या माध्यमातून वेगळे विभाग करुन निधी पूरवत आहे. तर महाराष्ट्र शासनाने राज्यपातळीवर आदिवासी लोकांचा विकास साध्य करण्यासाठी विभागीय व स्थानिक पातळीवर स्वंतत्र आदिवासी विभागाची निर्मीती केलेली आहे. तरीही आदिवासी लोकांचे प्रश्न सुटलेले दिसत नाही.

**प्रस्तावना :**

स्वयंसेवी कार्ये हे भारतातील अगदी प्राचीन काळापासून चालत आलेले आहे. प्राचीन आणि मध्ययूगीन काळात स्वयंसेवी मार्फत नैसर्गिक आपत्तीत लोकाना मदत केली जात असे. उदा. दुष्काळ, पूर, भूकंप, इत्यादी. परंतु ही परिस्थिती ब्रिटीशांच्या काळात बदलली आहे. सोसायटी रेजिस्ट्रेशन ॲक्ट 1860 नूसार स्वयंसेवी कार्ये हे नोंदणीकृत व संस्थात्मक करण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर सुध्दा भारत सरकारने हे नियम चालूच ठेवले. या नियमाना पंचवार्षिक योजनेत समाविष्ठ करुन सर्वसामान्य नागरिकांच्या विकासासाठी उपयोग केला. शासनाने आदिवासी लोकांचा विकास करण्याच्या उद्देशाने वेगवेगळया कार्यक्रमाची आखणी करुन आमंलवजावणी केली आहे. या कार्यक्रमांना केंद्रिय आणि आंतर राष्ट्रीय संस्थेकडून आर्थिक पूरवठा करण्यात येतो. हे कार्यक्रम म्हणजे उदा. बालकांचा विकास, अरोग्य, शिक्षण, प्रशिक्षण. इत्यादी. स्वंयसेवी संस्थाची भूमिका 1980 च्या दशकात प्रामुख्याने बदलली, खास करुन 7 व्या पंचवार्षिक योजनेनंतर स्वंयसेवी संस्थाना वेगवेगळे नियोजन आणि अमलबजावणीसाठी सहभाग करण्यात आला जसे कि गरिबी कमी करणे, ग्रामीण व शहरी भागात घरे बांधणी करणे, रोजगार प्राप्त करणे इत्यादी. हे सर्व योजना राबविले तरीही आदिवासींचे प्रश्न सुटलेले नाहीत. त्यामुळेच अनेक निमशासकिय अनेक संस्था प्रयत्न करत असल्याचे स्वतंत्र्य उत्तर काळात दिसून येत आहे.



त्यापैकी अनेक निमशासकिय संस्था, भारतीय तंत्वज्ञान विचार सरणी, सुधारणावादी, मानवतावादी, गांधीवादी विचार धारा, हिंदूवादी, विकासवादी दृष्टीकोणातून आदिवासी लोकांचा विकास साध्य करण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

.

### *प्रस्तूत अध्ययनाचे उददेश :–*

1.स्वंयसेवी संस्थेच्या स्वंरचनेचे स्वरुप सांगून त्या कशा लोकशाही पध्दतीने कार्ये करत आहेत याचे विश्लेषण करणे.
2.सद्यास्थितीतील विकासाच्या प्रक्रियेतील स्वंयसेवी संस्थेची आदर्शात्मक विचारसरणीचा शोध घेणे.
3.स्वंयसेवी संस्थेची भोगोलिक क्षेत्रकार्य, विषय कार्य आणि तिच्या यशाची तीव्रता जाणून घेणे.
4.स्वंयसेवी संस्थेचा आर्थिक स्त्रोत आणि आदिवासी विकासावरील निधी व तिच्या उपयोगाची तार्कीकता जाणून घेणे.
5.प्रकल्पातील लाभार्थ्यांचे स्वरुप आणि त्यांचा झालेला फायदा जाणून घेणे.
6.स्वयंसेवी संस्था आणि तिचा इतर संस्थेसोबत (सरकारी–कार्यालय, पंचायत राज,) यातील सहसंबंध जाणून घेणे.

वरिल उद्देश समोर ठेवून ते साध्य करण्यासाठी नांदेड जिल्हातील किनवट तालूक्याची निवड केली आहे.



### *अध्ययनाचे क्षेत्र :–*

किनवट तालूका (नांदेड जिल्हा) हा आंध्राप्रदेशाच्या व महाराष्ट्राच्या सिमेवर असून अतिशय मागास व अतिदुर्गंम्य आदिवासी भाग म्हणून ओळखला जातो. किनवट तालूक्यात एकूण 134 ग्रामपंचायत असून त्यात 191 गावे आहेत. त्यापैकी संस्थेने 170 गावात जावून प्रत्यक्ष कार्य केलेले आहे.

या भागात 8 प्रकारचे आदिवासी जमाती आहेत त्यापैकी संस्थेने 7 आदिवासी जमातीवर कार्ये केले आहे. किनवट तालूक्यात आदिवासी जमातीचे नावे अशी आहेत. गोंड, कोलाम, परधान, आंध, मन्नेरवारलू, कोळी महादेव, नायकडा भिल्ल, पारधी, जमाती आहेत. या आदिवासी जमातीचे उदरनिर्वाहाचे साधने सारखेच आढळून आले आहे. पण कोलाम समाजाचे उदरनिर्वाहाचे साधने म्हणजे बांबू पासून टोपली व शोभेची वस्तू तयार करुन बाजारपेठेत विक्री करुन तर मोल मजूरी, करुनही उदरनिर्वाह भागवतात. कोलाम आदिवासी समाज हा इतर जमाती पेक्षा जास्तच मागास व दारिद्रय अवस्थेत दिसून आला आहे. त्यांच्या पर्यंत विद्यूत, घरे, रस्ते, पाणी पूरवठा, शिक्षण, अरोग्य असे कोणते ही योजना या जमातीपर्यंत पोहचले नाहीत. व कोलाम समाजात एकही व्यक्ती शिक्षण घेतलेला आढळून आलेला नाही. याच जमाती सारके म्हणजे पारधी समाज आहे. याच पारधी समाजाला फाशी फारधी असेही म्हणतात. या पारधी समाजाचा व्यवसाय जंगलात शिकार करणे आणि पोटाची खळगी भरणे अशी अवस्था या जमातीची आजही आहे. कोलाम आणि पारधी समाजाला स्वतःची जमीन नाही. त्यामुळे हे दोन आदिवासी जमाती अतिशय मागास आहेत.

तर इतर सहा जमाती गोंड, आंध, कोळी महादेव, नायकडा भिल्ल, मन्नेरवारलू, परधान, या आदिवासी जमातीचा जवळपास उदरनिर्वाहाचे साधने सारखेच आढळून आले आहे. उदा. तेंदू पत्ता, डिंक, चारोळी, टेंबराचे फळे, लाकडाची मोळी, कंद मूळे अशी अनेक हंगामी कामे करुन उदरनिर्वाह भागवतात तर बाकीच्या काळात शेती, शेतमजूर, विटभट्टीवर कामे करतात. तर बरेच आदिवासी शहराकडे स्थलांतरित झालेले दिसून आले आहेत तर काही आदिवासी आजही रोजगार शोधसाठी वनवन भटकत आहेत. किनवट तालूक्यातील आदिवासी जमातीवर वारंवार अत्याचार झालेला आहे. पूर्वी निझाम सरकार, ब्रिटीश, (इंग्रज सरकार) सावकार, तर अलिकडच्या काळात बंजारा समाजाचाही कळत न कळत त्यांच्यावर अत्याचार चालूच आहे.



### *नांदेड जिल्हातील आदिवासी लोकसंख्या :–*

2001 च्या जनगणनेनूसार नांदेड जिल्हातील आदिवासींची लोकसंख्या 253596 एवढी असून यात पुरुषांची लोकसंख्या 129515 एवढी तर स्त्रीयांची लोकसंख्या 124081 आहे. म्हणजेच स्त्रीयांची लोकसंख्या 5434 ने कमी आहे. तर त्यापैकी नांदेड जिल्हातील ग्रामीण भागातील आदिवासींची एकूण लोकसंख्या 222816 एवढी आहे. तर त्यापैकी पुरुषांची संख्या 113794 आहे तर स्त्रीयांची संख्या 109051 इतकी आहे. ही पाहिली तर पुरुषांच्या तुलनेत स्त्रीयांची लोकसंख्या खुपच कमी आहे. तसेच नांदेड शहरातील वास्तव्यास असलेली आदिवासी जमातीची लोकसंख्या 30750 असून पूरुषांची संख्या 15721 आहे तर स्त्रीयांची संख्या 15029 आहे. या लोकसंख्येची पुरुषांच्या तुलनेत पाहिले तर 708 स्त्रीयां कमी आढळून आले आहे. त्याच पध्दतीने किनवट तालूक्याची एकूण लोकसंख्या 58527 असून पुरुषांची लोकसंख्या 29513 आहे. तर स्त्रीयांची लोकसंख्या 29013 आहे. एका तालूक्यात पूरुषांच्या तुलनेत लोकसंख्या पाहिले तर 500 स्त्रीयां कमी आहेत. किनवट शहरामध्ये आदिवासी पूरुषांची लोकसंख्या 831 आहे तर स्त्रीयांची संख्या 859 आहे. तर या संख्ये मध्ये पाहिली तर पुरुषांपेक्षा स्त्रीयांची संख्या 28 ने जास्त आहे. त्याचप्रमाणे किनवट तालूक्यातील ग्रामीण भागातील आदिवासी लोकसंख्या 56837 असून पुरुषांची लोकसंख्या 28683 आहे तर स्त्रीयांची संख्या 28154 एवढी असून पुरुषांच्या तुलनेत स्त्रीयांची संख्या 529 ने घटलेली दिसून आली आहे.

आदिवासी स्त्रीयांची संख्या घटण्याचे अनेक कारणे आहेत. त्यापैकी अंधश्रध्दा, निकृष्ट पध्दतीचे राहणीमान, अरोग्याची निष्काळजीपणा, कुपोषण असे अनेक आजार जडल्यामुळे आदिवासी भागात स्त्रीयांची संख्या घटत असलेली दिसून येत आहे.

### *संस्था निवडण्याचे कारण :–*

ग्रामीण विकास बहुउद्देशीय समाज सेवा संस्था किनवट या संस्थेची स्थापना 1995 साली करण्यात आली. तेव्हा पासून आदिवासी विकासाच्या प्रकल्प / योजना राबविले आहेत. अंदाजे 20 पेक्षा जास्त.
इतर संस्थेमध्ये एकच प्रकल्प चालू होते व ते ही व्यवस्थित नसल्यामुळे इतर संस्था संशोधनासाठी घेण्यात आले नाही.
संस्थेची माहिती देण्यास नकार देत होते. त्यांनी काही शासणाची प्रकल्प राबिवीली होती. त्यामध्ये केलेल्या भ्रष्टाचार उगड होतो म्हणून माहिती देण्यास नकार देत होते असे दृष्टीस आले.
बऱ्याच संस्था नोंदनी केलेले आहेत पण प्रत्येक्षात कार्ये केलेले नाही.
ग्रा. वि. ब. स. सेवा संस्थाचे काम मोठया प्रमाणात दिसून आले आहे.
ग्रा. वि. ब. स. से. संस्थाकडे सर्व कामाचे पुरावे असल्यामुळे निवडले आहे.
इतर संस्थेच्या तुलनेत सर्व प्रकारचे प्रकल्प / योजना राबविले आहेत.
या संस्थेमध्ये M.S.W केलेली सदस्य मंडळ व कर्मचारी मंडळ आहेत.
या संस्थेची कार्यकारीणी मंडळ प्रशिक्षित आहेत.
संस्थेचे जवळपास 10 प्रकल्प सद्या चालू आहेत.



### *संशोधनासाठी निवडलेल्या स्वंयसेवी संस्थेची माहिती.*

ग्रामीण विकास बहुउद्देशीय समाज सेवा संस्थेची स्थापना सन 18 / 04 / 1995 मध्ये करण्यात आली आहे. 1995 पासून संस्थेचे कार्य चालू करण्यात आले. संस्थेच्या कार्याचा उद्देश राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या “गावाकडे–चलाश या संदेशास अनूसरुन संस्थेच्या कार्यास सुरुवात करण्यात आली. निरंतर विकासाच्या ध्येयाने प्रेरित होवून ग्रामीण भागातील जनतेचा व आदिवासी समाजाचा आर्थिक, सामाजिक, राजकिय, शैक्षणिक , सांस्कृतिक, अरोग्य या सर्व बाबीचा सर्वांगीन विकासाच्या दृष्टीने प्राथमिक स्थरावर प्रबोधनात्मक व ग्रामीण विकास योजनेच्या अनूशंगाने समाज व शासन समन्वयाच्या दृष्टीने ग्रामीण क्षेत्रातील समस्या आणि शासणाच्या विकास योजनेचा समाविष्ट करुन किनवट तालूक्यातील अविकसीत क्षेत्रात किमान प्राथमिक सुविधा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात आला आहे. किनवट तालूका आणि दुर्गम जंगल क्षेत्र असल्याने येथील शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. मजूरांना बारमाही रोजगार मिळत नसल्याने भुमिहीन, अल्पधारक शेतमजूर रोजगाराच्या शोधात मोठया प्रमाणावर आंध्राप्रदेशात जिनींग प्रेसिंग, विटभट्टी, भातशेती, व इतर कामासाठी स्थलांतरीत होतात. स्थलांतरीत कुटूंबासोबतच प्राथमिक शिक्षण घेणारे लहान बालकेही स्थलांतरीत होतात. त्यामुळे त्याठिकाणी बालमजूरी म्हणून कामे करतात. महिलामध्ये निरक्षरतेचा प्रमाणे अधिक असल्यामुळे अज्ञान व अंधश्रध्दा प्रामुख्याने आहे.

संस्थेने आदिवासी जमातीचा दारिद्र, मागासलेपणा लक्षात घेवून 1996 पासून सामूहिक आदिवासी विवाह मेळाव्याची सुरुवात केली आणि यामुळे आदिवासी समाज कर्जमुक्त होईल या उद्देशाने हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात आले. त्याच प्रमाणात अनेक प्रकल्प व योजना संस्थेने राबविलेले आहे. ते योजनांची यादी खालील प्रमाणे आहे.



### *संस्थेचे चालू असलेले प्रकल्प/उपक्रम*

1.महिला बचत गट मागदर्शन केंद्र किनवट – 2004
2.महिला बचत गट अवस्थापण – 2008
(सुक्ष्म पत पूरवठा प्रकल्प)
3.शिवनकला प्रशिक्षण केंद्र – 2010
4.पारंपारिक पाटा बियाने वाटप – 2010
5.सिंचन पड प्रकल्प – 2010
6.पाटा बियाणे वाटप – 2010.
7.एकात्मिक पानलोट अवस्थापण कार्यक्रम – 2010 ;्ٕप्ॅडच्द्ध
8.धान्य किट वाटप कार्यक्रम – 2011
9.मडकी किट वाटप – 2011
10.पाटा बियाणे वाटप – 2010.

### *संस्थेचे बंद झालेले प्रकल्प/उपक्रम*

1.सामूहिक आदिवासी विवाह मेळावा – 1996 ते 2002
2.बाल कामगार निर्मुलन शिक्षण जागृती अभियान – 2007–2008
3.महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना – 2007–2010
4.वन औषधी वनस्पती उपक्रम – 2006 ते 2009
5.शेतकरी पूरुष बचत गट 25 – 2007
6.अरोग्य तपासणी व उपचार शिबीर 2007–2009
7.गाव सुक्ष्म नियोजन कार्यशाळा – 2005–2008
8.पुरक पोषण आहार उपक्रम – 2009
9.कृषी गांडूळ व सेंद्रिय शेती उपक्रम – 2009
10.महिला हक्क परिषद किनवट – 2010
11.आदिवासी विकास कार्यक्रम – 2002

संस्थेच्या स्थापनेपासून म्हणजेच 1996 पासून आजपर्यंत संस्थेने 20 प्रकल्पापेक्षा जास्त राबविलेले आहे. त्यापैकी 1) स्वयं सहायता बचत गट 2) एकात्मिक पानलोट विकास कार्यक्रम आदिवासी भागात स्वयंसेवी संस्थेने मोठया प्रमाणात राबविल्यामुळे या दोन प्रकल्पाची संशोधनासाठी निवड केलेली आहे.

### *निष्कर्ष :–*

वरिल विषयासी संबंधीत संशोधन करत असताना स्वंयसेवी संस्थेच्या माध्यमातून आदिवासी विकास होत आहे का नाही यावर अध्ययन करत असताना क्षेत्र कार्यात जावून प्रत्येक्षात निरीक्षणात आढळून आलेले काही निष्कर्ष आलेले आहेत.

### *स्वंयसाहयता महिला बचत गट :–*

1.बचत गटात आल्यामुळे त्यांना बाजार पेठ, बॅकेचे अर्थिक व्यवहारांची जाणीव झालेली आहे.
2.बचत गटात असल्यामुळे आदिवासी महिलेकडेही त्यांच्या गरजे प्रमाणे रक्कम जमा आहे.

3.आदिवासी महिला बचत गटाच्या माध्यमातून त्यांच्याजवळ रक्कम जमा असल्यामुळे मानसिक समाधान कारक आहेत.
4.बचत गटाकडून गावातील लोकाना 3 टक्के ते 5 टक्यांनी लग्नासाठी, उपचारासाठी, शेतीसाठी व अन्य कारणासाठी अर्थिक व्यवहार करतात.
5.आदिवासी भागात काही महिला बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय ही करत असलेले आढळून आले आहे.
6.बचत गटामुळे बऱ्याच महिलांचे शासकिय कर्मचाऱ्यांकडून फसवणूक होत आहे.
7.बचत गटाना जिल्हा शासकिय कर्ज देवून आदिवासी भागात पापड, लोणचे, आवळा कॅन्डी, या सारखे व्यवसाय चालू करुन देवून लाखो रुपयांची लूट करण्यात आलेले आहे (उदा. शनिवार पेठ ता. किनवट)
8. बचत गटाच्या माध्यमातून काही गटातील आदिवासी महिलानी शासणाचे मोठी योजना मिळावी म्हणून वैयक्तीक खोटया माहिती देत आहेत.
9.मंत्री लोकानी आले कि बचत गटाच्या महिलांना पत्र देवून जि.प.नांदेडच्या कर्मचाऱ्यानी व्यवसाय प्रदर्शन मांडण्यासाठी बोलावतात पण महिलांची राहण्याची व जेवण्याची सोय करत नाहीत.
10.आदिवासी महिलांचा विकास करण्याऐवजी स्वतःचा विकास करुन घेतले आहेत.
11.शासकिय कर्मचाऱ्याने गटाचे फक्त वापर करुन घेतले आहे.
12.आदिवासी भागात योग्य व्यवसायाची निवड न झाल्यामुळे स्वंयसाहयता बचत गटाची उद्योग जास्तीत जास्त प्रमाणात बंद पडलेले आढळून आले आहे.



*2. एकात्मिक पानलोट विकास कार्यक्रम :*

1.आदिवासी विभागात एकात्मिक पानलोट विकास कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वंयसेवी संस्थाने जाणीव जागृती व प्रशिक्षण कार्यक्रम मोठया प्रमाणात राबविले आहे.
2.संस्थेने किनवट तालूक्यातील जवळपास 22 गावात कार्ये केलेले आहे.
3.एकात्मिक पानलोट विकासाचे कामे 22 गावापैकी 4 शासणाने गावात राबविण्यात आले आहे.
4.4 गावात कामे राबविली आहेत पण कामे व्यवस्थीत झालेली नाहीत.
5.रोजगारांना रोजगार प्राप्त झालेले नसल्यामुळे आदिवासी रोजगारांमध्ये नाराजी दिसून आलेली आहे.
6.संशोधनासाठी निवडलेल्या 6 गावांपैकी तोटंबा या गावात जास्त प्रमाणात काम झालेले दिसून आले आहे.
7.झालेली कामे काही राजकिय लोकांच्या शेतीमध्ये झालेले आहेत. (विहीर पूणरभरण, नाला सरळीकरण शेततळे)
8.शासकिय अधिकाऱ्यानी आदिवासी लोकाना दिवास्वप्न दाखवून वारंवार फसवलेले दिसून आले आहे.
9.किनवट तालूक्यातील काही भागात रोजगारांची यादी तयार केली जाते पण प्रत्येक्षात कामावर रोजगार नसतात रोजगारांच्या बदल्यात आधूनिक यंत्राचा वापर करुन शासणाचे लाखो रुपये उचलेले आहे.

*निरिक्षणास आढळून आलेले सर्व साधारण निश्कर्श.*

1.अधिकारी किंवा संशोधकानी आदिवासी लोकांचा अभ्यास करण्यासाठी गेले असता आदिवासींची परिस्थिती वेगळी असते व त्यांचे सांगणे वेगळे असते.
2.शासण आदिवासी लोकांचा सर्वांगिंन विकास साध्य करण्यासाठी प्रभावी योजना राबवित आहे. पण आदिवासी जमातीत मोठया प्रमाणात निरक्षरता आणि अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा असल्यामुळे शासकिय योजना त्यांच्यापर्यंत पोहचत नाहीत.
3.आदिवासी जमातीतला नेतृत्व करणारा व्यक्ती हा इतर आदिवासी जमातीचा विकास करावा या हेतूचा दिसून आलेले नाही.
4.अलिकडच्या काळात म.ग्रा.से.हमी योजना चालू झाल्यामुळे आदिवासी समाज अधिकच आळशी झालेला दिसून येतो. म्हणजेच 1 दिवस काम करुन 10 दिवस बसून खातो अशी स्थिती पाहावयास मिळाली आहे.
5.आदिवासी लोकांना राहण्यासाठी घरे दिली असता त्यांनी ते घरे आडगळीची किंवा गौऱ्या, लाकडे व इतर साहित्य त्यात भरून ठेवतात.
6.आदिवासी लोकांचे उदरनिर्वाहाचे साधने शेती, शेतमजूरी, टेंबराचे फळे, टेंबराचे पाने गोळा करणे, चारोळी, डिंक, लाकडाची मोळी, विकणे, विटभट्टीवर कामाला जाणे असे अनेक कामे करुन उदरनिर्वाह भागवतात.
7.कोलाम समाजात शिक्षण घेतलेले एकही व्यक्ती आढळून आलेले नाही. यांच्या मध्ये एकही पूरुष किंवा स्त्री 10 वी पर्यंत शिक्षण घेतलेले नाही.
8.इतर 7 आदिवासी जमातीपेक्षा सर्वात मागास कोलाम आदिवासी जमात आहे.

9.किनवट तालूक्यात तेलगू भाषेचा प्रभाव जास्त प्रमाणात आहे.
10.किनवट तालूक्यात तेलगू, मराठी, गोंडी, उर्दू, हिंदी भाषा प्रामुख्याने बोलले जाते.
11.किनवट तालूक्यातील बऱ्याच गावात जाण्यासाठी कच्चे व पक्के रस्ते नाहीत.
12.किनवट तालूक्यात पूरुषांच्या तुलनेत स्त्रीयांची संख्या खुपच कमी झालेली आढळून आली आहे.
13.किनवट तालूक्यातील ग्रामीण भागात स्त्रीयांच्या तुलनेत पुरुषांची संख्या जास्त आहे. कारण ग्रामीण भागात रस्ते नसल्यामुळे दळणवळाचे साधने नाहीत. त्यामुळे आदिवासी स्त्रीयांची प्रस्तूती दरम्याण मृत्यूची संख्या जास्त आहे. या सोबतच अनेक कारणे आहेत जसे कि, निकृष्ट दर्जाचे खानपान, निष्कृष्ट दर्जाचे राहणीमान, अरोग्याची निष्काळजीपणा, अंधश्रध्दा, धर्मभोळेपणा आदिवासी समाजात हे प्रमुख कारणे आढळून आले आहे.



*संदर्भ सुचीः*


1.प्राथमिक स्त्रोत :

1.किनवट तालूक्यातील प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या मुलाखतीनुसार गावे : शनिवार पेठ, सिरमेटी, दर सांगवी सिंध, निराळा, पेंदा, घोगरवाडी, सारखणी, पार्डी, शिवणी, झळकवाडी, तल्लारी, तोंटंबा, अप्पारावपेठ, गोंडमहागाव इत्यादी.

2. (NGO) कडून लाभ घेतलेले लाभार्थी. त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखतीनुसार.

2.भारत के आदिवासी विकास समस्याये – पी.आर.नारडू
प्रकाशन : राधा पब्लिकेशन नई दिल्ली 110002

3.आदिवासी विकास एंव गैरसरकारी संगठन
प्रकाशन : उदयसिंह राजपूत रावत पब्लिकेशन जयपूर.
4.आदिवासी विकासाचे दारीद्रय – प्रा.डॉ.सुदर्शन देशमुख
प्रकाशन : निर्मला प्रकाशन नांदेड.
5.मानव संसाधन विकास – प्रा. व्ही. बी. पाटील
प्रकाशन : के. सागर पुणे.
6.महाराष्ट्रातील आदिवासी जमाती (सामाजिक व संस्कृतिक मागोवा) डॉ. गोविंद गारे
प्रकाशन : कॉन्टिनेन्टेल प्रकाशन विजयानगर पुणे – 30.
7.अनुसूचित जाती व जमातीचे कायदे ॲड. अभया शेलकर
प्रकाशन : नाशिक लॉ हाउस, औरंगाबाद

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net